जा.क्र जिपसो/ शिक्षण/आस्था-१/ १०८-१८ /१८
सोलापूर दिनांक - २५ /०१/२०१८

प्रति ,

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती , ------------------------------ सर्व

विषय - सार्वत्रिक बदल्या सन २०१८
संदर्भ - १. शासन निर्णय क्र जिपब -४८१७-प्र.क. ७-आस्था-१४ दि.२७.२.२०१७
२. मा कक्ष अधिकारी महा. शासन यांचेकडील पत्र क्र जिपब-४८१८-प्र.क्र.४-२०१७- आस्था-१४ दि. ११.१.२०१८

उपरोक्त विषयास व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की , आपले अधिनस्त कार्यरत असलेल्या सेवेत १० वर्ष झालेल्या पदवीधर शिक्षक (उर्दू , कन्नड व मराठी ), उपशिक्षक (उर्दू , कन्नड व मराठी ), मुख्याध्यापक (उर्दू , कन्नड व मराठी ), यांची तात्पुरती जेष्ठता यादी एसएसए ऑल ब्लॉकवर ईमेल व्दारे कळविण्यात आलेले आहे. व जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदरची तात्पुरती सेवा जेष्ठता यादी आपल्या अधिनस्त असलेल्या पदवीधर शिक्षक (उर्दू , कन्नड व मराठी ),उपशिक्षक (उर्दू , कन्नड व मराठी ), मुख्याध्यापक (उर्दू , कन्नड व मराठी ),यांचे निदर्शनास आणून सदर जेष्ठता यादी बाबत काही दुरुस्ती किंवा आक्षेप असल्यास त्या बाबतचे लेखी निवेदन संबंधिताकडून घेऊन व त्याच्या तक्रारी बाबत आपण स्वत:सेवा पुस्तक व इतर अधिकृत कागदपत्रावरुन पडताळणी करुन खात्री करावी. या बाबत संबंधित कर्मचा-यांच्या काही अभिप्राय किंवा हरकती असल्यास संबंधितांच्या कागदपत्रासह दि २९/०१/२०१८ पर्यंत या कार्यालयास खास दुता मार्फत सादर करावी .त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार येणार नाही याची गांभीयाने नोद घ्यावी. .

शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद सोलापूर